**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.किशोर पुरूषोत्तम सरपोतदार
प्लॉट नं.७, प्रणयराज पॅराडाईज, साई पेट्रोलपंपाजवळ,
सुभाषनगर, विश्रांतवाडी, पुणे

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण संचालनालय, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १० / २०१० / पुणे - २६०२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०१० |

३. उपस्थित

**अपीलकर्ता** श्री.किशोर पुरूषोत्तम सरपोतदार
प्लॉट नं.७, प्रणयराज पॅराडाईज, साई पेट्रोलपंपाजवळ,
सुभाषनगर, विश्रांतवाडी, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण
संचालनालय, पुणे श्री.सदानंद शंकरराव शिंदे

| | |
|---|---|
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपल्या पत्नीचे सेवानिवृत्ती वेतन, खाजगी अनुदानित शाळेतील मुख्याध्यापक पदाच्या वेतनश्रेणीला मान्यता आदींबाबतची माहिती आपण मागितली होती. आपल्या पत्नीला योग्य ते सेवानिवृत्ती वेतन मिळालेले नाही. सेवानिवृत्ती उपदानावर व्याज दिलेले नाही. विभागीय उपशिक्षण संचालक, अमरावती यांनी सौ.सरपोतदार यांच्या सेवानिवृत्ती वेतनाबाबत शिक्षण संचालनालयाच्या आदेशानुसार दिलेल्या अहवालाची प्रतही दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.किशोर पुरूषोत्तम सरपोतदार यांनी केली.

विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती यांनी १५ दिवसात अहवाल सादर करावा, असे दि.९.६.२००९ च्या पत्रान्वये कळविले होते. परंतु अद्याप अहवाल प्राप्त झालेला नसल्यामुळे प्रत देणे शक्य नव्हते. सौ.सरपोतदार यांना मुख्याध्यापक पदाचे सेवानिवृत्ती वेतन मिळणे, सेवानिवृत्ती उपदानावर व्याज देणे या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. तरीही विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती यांच्याकडे त्याबाबतचा पाठपुरावा पत्राद्वारे केला आहे,. श्री.सरपोतदार यांना मूळ विषयाच्या अनुषंगाने वेळोवेळी उत्तर व माहिती देण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे श्री.सदानंद शंकरराव शिंदे यांनी केले.

श्री.सरपोतदार यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नाही. तथापि विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती

यांच्याकडून संबंधित प्रकरणातील अहवाल मागवून घेऊन आठ दिवसांत अपीलकर्त्यांस त्याबाबत कळवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

(१) अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांनी आयोगाला दि.१५.८.२०१० पर्यंत सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय महादेव चौगुले
मु.पो.काराजनगी, ता.जत, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा व
स्वच्छता समिती, काराजनगी, ता.जत, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष /सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा व
स्वच्छता समिती, ग्रामपंचायत काराजनगी, ता.जत, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १००७ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.७.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संजय महादेव चौगुले
मु.पो.काराजनगी, ता.जत, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा व
स्वच्छता समिती, काराजनगी, ता.जत, जि.सांगली श्री.आर.एस.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष /सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती,
ग्रामपंचायत काराजनगी, ता.जत, जि.सांगली श्री.एस.व्ही.माने

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.५.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१५.७.२०१० रोजी घेण्यात आली.

भारत निर्माण योजने अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने केलेल्या योजनांचे हिशेब व अन्य माहिती १७ महिने होऊनही दिलेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.संजय महादेव चौगुले यांनी केली.

संबंधित समिती ग्रामस्थांची असून त्यावर ग्रामपंचायतीचे / सरकारचे नियंत्रण नाही. तसेच तांत्रिक सल्लागारांनी कामाचे मूल्यांकन लेखी दिलेले नव्हते, त्यामुळे माहिती देता आली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष /सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, ग्रामपंचायत काराजनगी, ता.जत, जि.सांगली श्री.सहदेव विठोबा माने यांनी केले. संबंधितांकडून माहिती प्राप्त करून घेऊन देण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले.

संबंधित समिती सरकारच्या नियंत्रणाखालील नसल्याचे लक्षात घेता जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष /सचिव, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, ग्रामपंचायत काराजनगी, ता.जत, जि.सागली यांचे प्रतिपादन मान्य करण्यात येत आहे. समितीकडील कागदपत्रे उपलब्ध करून घेऊन माहिती तयार करून व प्रमाणित करून अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
31 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रभाकर दिगंबर जोजारे
२९, मोहिते नगर, होटगी रोड, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय
दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय
दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर श्री.जी.एस.सांगडे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर श्री.ए.जे.भोसले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

<u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि.१९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१५.४.२०१० रोजी घेण्यात आली.

सर्व कर्मचाऱ्यांबाबतची सेवाविषयक संपूर्ण माहिती शासकीय कार्यालयामध्ये ठेवली जात नाही. त्याचा गैरफायदा कारभारात घोटाळा करणारे घेतात, म्हणून अशी माहिती ठेवली व दिली गेली पाहिजे. ती दिली गेली नाही, असे अपीलकर्ता श्री.प्रभाकर दिगंबर जोजारे यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे.

अपीलकर्ता यांनी सन १९७२ पासूनची तलाठी, मंडल निरीक्षक आदींबाबतची माहिती मागितली होती. ती संकलित करण्यास विलंब लागणार असल्याचे विहित मुदतीत त्यांना कळविले. वेतन देयकावरून व इतर कागदपत्रांवरून शोध घेऊन प्राप्त झालेली माहिती श्री.जोजारे यांना निःशुल्क दिली. यादी मागण्यामागे माहितीपेक्षा कर्मचारी / अधिकारी यांना त्रास देण्याचा श्री.जोजारे यांचा उद्देश आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर श्री.ए.जे.भोसले यांनी केले.

माहितीबाबत जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

पुणे
30 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.रामकृष्ण धोंडीबा नायकोडे
मु.पो.पोथरे, ता.करमाळा,
जि.सोलापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,**
नाथ प्राईड, सिव्हिल हॉस्पिटलच्या पूर्वेस,
उत्तर सदर बझार, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव,**
विद्या विकास मंडळ,
विद्यानगर, करमाळा, ता.करमाळा,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०११/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४/७/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>श्री.रामकृष्ण धोंडीबा नायकोडे<br>मु.पो.पोथरे, ता.करमाळा,<br>जि.सोलापूर<br><br>**जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव,**<br>विद्या विकास मंडळ,<br>विद्यानगर करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर<br>यांचे प्रतिनिधी श्री.श्रीकांत सिताराम कांबळे | |

| | |
|---|---|
| | **अपिलीय प्राधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,**<br>नाथ प्राईड, सिव्हिल हॉस्पिटलच्या पूर्वेस,<br>उत्तर सदर बझार, सोलापूर<br>यांचे प्रतिनिधी श्री.एम.डी.शेख (अधीक्षक) |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** विद्या विकास मंडळ करमाळा यांनी नेमलेल्या चौकशी समितीचा व सत्यशोधक समितीचा अहवाल |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.रामकृष्ण धोंडीबा नायकोडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२४/७/२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. 'माझ्या माहिती अर्जानुसार मला सर्व माहिती मिळाली आहे. माझी काहीही तक्रार नाही. तरी कृपया, अपील निकाली काढावे', असे निवेदन अपिलकर्ता श्री.नायकोडे यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 26 JUL 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सिध्देश्वर वसंतराव डंबरे
शिवाजीनगर, ता.बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रूग्णालय,
पांगरी, ता.बार्शी , जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अधीक्षक, ग्रामीण रूग्णालय,
पांगरी, ता.बार्शी , जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०१७ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रूग्णालय,
पांगरी, ता.बार्शी , जि.सोलापूर तत्कालीन डॉ.एस.एम.वैद्य

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अधीक्षक, ग्रामीण रूग्णालय,
पांगरी, ता.बार्शी , जि.सोलापूर डॉ.एस.एम.वैद्य

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता यांनी मागितलेली तीन वर्षांच्या काळातील सविस्तर माहिती दिली असून त्याची पोहोच दप्तरी आहे. माहितीबाबत त्यांनी प्रथम अपील केलेले नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक, ग्रामीण रूग्णालय, पांगरी, ता.बार्शी, जि.सोलापूर डॉ.एस.एम.वैद्य यांनी केले. अपीलकर्त्याची पोहोच असल्याच्या पत्राची प्रत त्यांनी सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.आनंद सायबू क्षिरसागर
भारती विद्यापीठासमोर, सुशिलनगर, घ.नं.६७, विजापूर रोड, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग क्र.१, जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सोलापूर श्री.व्ही.एस.मुळीक

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग क्र.१, जिल्हा परिषद, सोलापूर श्री.आर.बी.माहिंगडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

'भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रशाला, सेटलमेंट] सोलापूर' या प्रशालेविरुध्द आपण केलेल्या तक्रारीवर चौकशी करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी दिले होते. या चौकशी अहवालाची प्रत व अनुषंगिक माहिती जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग क्र.१, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी न दिल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.आनंद सायबू क्षिरसागर यांनी अपील अर्जात केली आहे.

याच शाळेच्या व याच विषयाच्या संदर्भात अपीलकर्ता गेल्या अनेक वर्षांपासून तक्रारी व अन्य स्वरूपाचे अर्ज करीत आले आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्यांनी २५-३० अर्ज व अपिले केली असून त्याच्या सुनावण्या व आदेश झालेले आहेत. त्या त्या वेळच्या उपलब्ध माहितीनुसार योग्य उत्तर देण्यात आले आहे. त्यांनी अर्ज केला तेव्हा चौकशी अहवाल प्राप्त झालेला नव्हता. नंतर तो प्राप्त झाला, असे जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग क्र.१, सोलापूर जिल्हा परिषद, सोलापूर श्री.आर.बी.माहिंगडे व अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सोलापूर जिल्हा परिषद, सोलापूर श्री.व्ही.एस.मुळीक यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
31 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.महेश भिमराव जाधव
१६, सहयोगनगर जलशुध्दीकरण केंद्राजवळ, पंढरपूर, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
सोलापूर जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
सोलापूर जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२४ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२०१० |
| **३.** | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** श्री.महेश भिमराव जाधव<br>१६, सहयोगनगर जलशुध्दीकरण केंद्राजवळ, पंढरपूर, जि.सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>सोलापूर जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.एन.वीर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६.४.२०१० रोजी घेण्यात आली.

आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), सोलापूर जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या कार्यालयात उपलब्ध असताना शाळेकडून घेण्यास कळविले. मुख्याध्यापकांनी माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.श्री.महेश भिमराव जाधव यांनी केली.

श्री.जाधव यांनी मागितलेली माहिती संस्थेच्या स्तरावरील असल्यामुळे अर्ज संस्थेकडे वर्ग केला व माहिती देण्याचे आदेश मुख्याध्यापकांना दिले. माहिती न दिल्याबद्दल संबंधित मुख्याध्यापकांचे वेतन स्थगित करण्याची कार्यवाही केली. पूर्ण माहिती दिल्यानंतरच स्थगित वेतन सुरू करण्यात येईल, असे मुख्याध्यापकांना व अपीलकर्त्यासही कळविले होते. अपीलकर्त्यास वेळोवेळी मागणी केल्यानुसार माहिती देण्यात आली असूनही माहिती न मिळाल्याची तक्रार ते करीत आहेत, असे शाळेच्या मुख्याध्यापकांनी कळविले व माहितीच्या छायांकित प्रती पुन्हा सादर केल्या, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सोलापूर जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.एन.वीर यांनी पूरक कागदपत्रांसह केले. ते लक्षात घेता माहिती मिळवून देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), सोलापूर जिल्हा परिषद, सोलापूर यांनी योग्य कार्यवाही केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
31 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अशपाक नुरद्दीन अत्तार
सर्जेराव जाधव सभागृहासमोर,
अक्कलकोटता,अक्कलकोट,जि.सोलापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** कार्यकारी अभियंता (ग्रामीण),
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.सोलापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., अक्कलकोट,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०४१/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.०४.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** कार्यकारी अभियंता (ग्रामीण),<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.सोलापूर श्री.ए.पी.पठाण<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. ,अक्कलकोट,<br>सोलापूर श्री.संजय चंद्रकांत शिंदे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

एका ग्राहकाच्या वीज जोडणी संदर्भात आपण मागितलेली माहिती अपुरी देऊ केल्यामुळे आपण नाकारली. वीज जोडणीच्या वेळी नियमानुसार घेतली जाणारी कागदपत्रे मागितली असता तो उपलब्ध नसल्याचे सांगितले जात असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,अक्कलकोट,सोलापूर यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.अशपाक नुरद्दीन अत्तार यांनी लेखी निवेदनात केली आहे.

नवीन वीज जोडणीसाठी लागणाऱ्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती अपीलकर्त्यास दिल्या आहेत. अन्य ग्राहकाची वीज जोडणी बंद करावी, अशी अपीलकर्त्याची मागणी असून तसे करता येणार नाही, हेही स्पष्ट करण्यात आले आहे. असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., अक्कलकोट,सोलापूर श्री.संजय चंद्रकांत शिंदे यांनी केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 31 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.बाळकृष्ण गजानन जोशी
एल.आय.जी. ३/४५,
महाराष्ट्र हौसिंग बोर्ड,
लक्ष्मीनगर, पुणे-९

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अधिकारी,**
पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
आगरकरनगर, पुणे-३०

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक,**
पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
आगरकरनगर, पुणे-३०

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०४४/२०१०/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्रीमती जे.के.मिसाळ, श्री.एस.बी.देशपांडे. श्रीमती आय.डी.कुलकर्णी इ. गाळेधारकांना पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, यांनी दिलेल्या नाहरकत प्रमाणपत्राच्या अनुषंगाने माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.बाळकृष्ण गजानन जोशी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे विचारात घेता त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) अन्वये

अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे प्रथम अपील केल्याचे दिसून येत नाही. तसेच अपिलासोबत बँक खात्याचा योग्य तपशील नमूद केलेला धनाकर्ष (डी.डी) जोडलेला नाही. अपिलासोबतच्या अन्य उपलब्ध कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, आगरकरनगर, पुणे यांनी केलेली कार्यवाही योग्य असल्याचे दिसते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर )
राज्य माहित्ती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 24 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.बाळकृष्ण गजानन जोशी
एल.आय.जी. ३/४५,
महाराष्ट्र हौसिंग बोर्ड,
लक्ष्मीनगर, पुणे-९

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण संचालक,**
उच्चशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,
पुणे-१

-उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**
उच्चशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,
पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०४५/२०१०/पुणे |
| २ | अपिलासोबत माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने अपेक्षित असणाऱ्या माहितीचा बोध होत नाही. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री.बाळकृष्ण गजानन जोशी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब व बँक खात्याचा योग्य तपशील नमूद केलेला धनाकर्ष (डी.डी) जोडलेला नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 25 JUL 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सिताराम कडप्पा गुंड
मु.पो.सावळेश्वर, ता.मोहोळ, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत
कार्यालय सावळेश्वर, ता.मोहोळ, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०४९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सिताराम कडप्पा गुंड
मु.पो.सावळेश्वर, ता.मोहोळ, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.मनीषा देसाई

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत
कार्यालय सावळेश्वर, ता.मोहोळ, जि.सोलापूर तत्कालीन श्री.एम.एस.मुलगे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६.४.२०१० रोजी घेण्यात आली.

आपण मागितलेली माहिती अपुरी व विलंबाने मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.सिताराम कडप्पा गुंड यांनी केली.

श्री.गुंड यांनी तीन वर्षांच्या काळातील विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली होती. त्याच काळात सुमारे चार महिने आपण वैद्यकिय रजेवर होतो. त्यानंतर त्यांना काही माहिती दिली व ऊर्वरित माहिती आजच समक्ष दिली, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अंधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय सावळेश्वर, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.एम.एस.मुलगे यांनी केले.

आपली शारिरिक-मानसिक स्थिती चांगली नसल्यामुळे, कौटुंबिक अडचणीमुळे व स्थानिक राजकीय दबावामुळे माहिती विहित मुदतीत देऊ शकलो नाही, असे श्री.मुलगे यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे. तथापि माहिती विलंबाने देण्यास हे समर्थन मान्य करता येणार नाही. ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे स्वरूप व प्रमाण, तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय सावळेश्वर, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.एम.एस.मुलगे यांनी विलंबाबाबत विस्ताराने केलेले निवेदन यांचा विचार करता, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय सावळेश्वर,

ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.एम.एस.मुलगे यांना अपुरी व विलंबाने माहिती दिल्याबद्दल रूपये ५०००/- शास्ती करण्यात येत आहे. ही शास्ती त्यांना सप्टेंबर २०१० - मध्ये मिळणाऱ्या ऑगस्ट २०१० या महिन्याच्या वेतनातून वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर यांनी करून त्याचा अहवाल आयोगाला सादर करावा.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
31 JUL 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रामचंद्र शंकर जाधव
भवानी पेठ,मराठा वस्ती,
संभाजी राजे तालीम जवळ,जि.सोलापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सहाय्यक आयुक्त (स),
सोलापूर महानगरपालिका,जि.सोलापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** अधीक्षक,
सामान्य प्रशासन विभाग,
सोलापूर महानगरपालिका,जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०५१/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.०४.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**जन माहिती अधिकारी तथा** अधीक्षक,<br>सामान्य प्रशासन विभाग,<br>सोलापूर महानगरपालिका,जि.सोलापूर श्री.चंद्रशेखर केशव पाणिभाते | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

सन १९९४ ते मार्च २००८ या काळात सोलापूर महानगरपालिकेने केलेल्या नोकर भरतीत स्वातंत्र्य सैनिकांसाठी असलेल्या जागांबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.रामचंद्र शंकर जाधव यांनी मागितली होती. विहित मुदतीत ती देण्यात आली. त्यांना आवश्यक असलेल्या संचिका अवलोकनासाठी त्यांना कळविले. तीन पत्रे पाठवूनही ते आलेले नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती

अधिकारी तथा अधीक्षक, सामान्य प्रशासन विभाग, सोलापूर महानगरपालिका, जि.सोलापूर श्री.चंद्रशेखर केशव पाणिभाते यांनी केले. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सामान्य प्रशासन विभाग, सोलापूर महानगरपालिका, जि.सोलापूर श्री.चंद्रशेखर केशव पाणिभाते यांनी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**स्थळ : पुणे**
**दि.** 30 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तात्रय एकनाथ माने
श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, भिमानगर, ता.माढा, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
सोलापूर जिल्हा परिषद, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
सोलापूर जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०५४ +१०५५ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.दत्तात्रय एकनाथ माने<br>श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, भिमानगर, ता.माढा, जि.सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>सोलापूर जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.एन.वीर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६.४.२०१० रोजी घेण्यात आली.

श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, भिमानगर, ता.माढा, जि.सोलापूर यांच्या संदर्भातील आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), सोलापर जिल्हा परिषद, सोलापूर यांनी न देता अर्ज शाळेकडे वर्ग केला. त्यांनी अर्धवट माहिती दिली. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सोलापूर जिल्हा परिषद, सोलापूर यांनी आदेश व स्मरणपत्र देऊनही मुख्याध्यापकांनी संपूर्ण माहिती दिली नाही. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.दत्तात्रय एकनाथ माने यांनी केली.

श्री.माने यांनी मागितलेले मान्यता प्रस्ताव आदी माहिती सन १९९६ मधील होती. त्यांना विहित मुदतीत उत्तर दिले, व आपल्या कक्षेतील माहिती दिली. संस्थेच्या पातळीवरील माहिती आपण देऊ शकत नसल्याचे स्पष्ट केले. तथापि ही माहिती मुख्याध्यापकांनी प्राप्त करून घेऊन द्यावी, असे आदेश आपण दिले. त्यानुसार काही माहिती मुख्याध्यापकांनी दिली. मात्र श्री.माने यांनी ज्या काळातील ऊर्वरित माहिती मागितली आहे, त्या काळात तेच संस्थेचे अध्यक्ष होते व संबंधित कागदपत्रे त्यांच्याकडेच असून आपल्याला उपलब्ध नाहीत, असे मुख्याध्यापक, श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, भिमानगर, ता.माढा, जि.सोलापूर श्री.प्र.भ.लोंढे यांनी नमूद करून तसे श्री.माने यांनाही कळविले, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सोलापर जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.एन.वीर यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे लक्षात घेता, आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात आहे.

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
31 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शेकु अंबऋषी लांडगे
अलीपूर, ता.बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता(सं.व सु.),
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित, ता.बार्शी, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता (ग्रा.), उपविभाग
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित, ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०५६ / सोलापूर |
| २ | सुनावणीचो तारीख | दि.१५.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शेकु अंबऋषी लांडगे
अलीपूर, ता.बार्शी, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता(सं.व सु.),
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.ए.एम.थोरात

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता (ग्रा.), उपविभाग महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.एस.के.दरबस्तवार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाचो (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकात एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१५.४.२०१० रोजी घेण्यात आली.

गावठाण पाणी पुरवठा फिडरवरून महावितरणची लाईन निवारा बहुउद्देशीय संस्थेला देण्यात आली, त्या विजेच्या वापराबाबत अंदाजपत्रकाची व एस्टिमेटची शासन निर्णयाची प्रत दिली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.शंकु अंबऋषी लांडगे यांनी केली.

संबंधित काम योजनेतून करण्यात आले, त्याबाबत शासन निर्णय नसतो. प्रकल्प पूर्ण तालुक्याचा असल्यामुळे विशिष्ट भागाची माहिती स्वतंत्रपणे मोजणी करून द्यावी लागणार असल्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (ग्रा) उपविभाग, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.एस.के.दरबस्तवार व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता(सं.व सु.), महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.ए.एम.थोरात यांनी केले. उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

पुणे

30 JUL 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्रीमती सरस्वती विष्णू गाढवे
मु.गाढवे वस्ती, पो.ता.मोहोळ, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर शहर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०६१ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर शहर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६.४.२०१० रोजी घेण्यात आली.

सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या संदर्भातील आपण मागितलेली माहिती अपुरी मिळाली व प्रमाणणित करून दिली नाही,अशी तक्रार अपीलकर्त्या सौ.सरस्वती विष्णू गाढवे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

कार्यालयाच्या स्तरावरील माहिती दिली. संस्था पातळीवरील माहिती देण्याबाबत संस्थेस कळविले. परंतु सहकारी गृहनिर्माण संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. दिलेली कागदपत्रे प्रमाणित करून देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिले. त्यानुसार पूर्तता केली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर शहर श्री.एस.यु.शिरापूरकर यांनी केले. त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

पुणे
31 JUL 2010